सोबत उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे "महाराष्ट्र राज्यातील सर्व विद्यापीठ व महाविद्यालयातील विद्यार्थी – विद्यार्थीनींच्या सुरक्षेबाबत उपाययोजना करणे संदर्भात" या विषयाचे पत्र क्रमांक : संकिर्ण-1111/प्र.क्र. 79/17/समन्वय, दिनांक : 23.10.2017 ची प्रत सोबत जोडली आहे.

----*----*----*----

क्रमांक:10/एनजीपी/संकीर्ण/2017/शा 2607
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. 1967,
मुंबई-400001.

दिनांक : 21 NOV 2017

प्रति,

1. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/ औरंगाबाद/ मुंबई/ नागपूर/ नाशिक/ पुणे,
2. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई,

यांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांचे अधिपत्याखालील अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यता प्राप्त सर्व संस्था प्रमुखांना सदर परिपत्रक निदर्शनास आणावे व परिपत्राच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याबाबत कळवावे.

(डॉ. सुभाष महाजन)
सहसंचालक,

सहसंचालक तंत्र शिक्षण, ... अमरावती

क्रमांक-विकाअ/शिक्षण/संकीर्ण/२०१४/ 2650
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.
दिनांक 28 NOV 2017

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

प्रत :-

१) प्राचार्य, अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/ वास्तूशास्त्र / एम.बी.ए./एम.सी.ए. पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था यांना कळविण्यात येते की, सदरहू पत्राच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करावी.
२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.

दिनांक :- २६ ऑक्टोबर, २०१७

प्रति.

१ ) विभागातील सह सचिव ( विद्यापीठ शिक्षण ) उप सचिव ( महाविद्यालयीन शिक्षण/तंत्र शिक्षण /कला / ग्रंथालये) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई — ४०० ०३२

२) संचालक (उच्च शिक्षण / तंत्र शिक्षण /कला / ग्रंथालय) महाराष्ट्र राज्य.

विषय :- महाराष्ट्र राज्यातील सर्व विद्यापीठ व महाविद्यालयातील विद्यार्थी - विद्यार्थीनींच्या सुरक्षेबाबत उपाययोजना करणे संदर्भात.

मा.श्री.रविंद्र वायकर, राज्यमंत्री, गृहनिर्माण व उच्च व तंत्र शिक्षण यांचे दि.१९.९.२०१७ चे पत्र सोबत पाठविण्यात येत आहे.

२. सदर प्रकरणी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांवर होणा-या रॅगिंग, दहशत, लैंगीक शोषण, प्रसंगी खुन इ. गंभीर घटनांमध्ये वाढ झाल्याचे वर्तमानपत्र अथवा इलेक्ट्रॉनिक मिडीयाच्या बातम्यातून कळते. विद्यापीठ व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांची सुरक्षा ही संबंधित शैक्षणिक संस्थेची असल्याने शैक्षणिक संस्थांचा, शैक्षणिक परिसर व वसतिगृहे, ग्रंथालय, उपहारगृह इत्यादी मध्ये सुरक्षेच्या पुरेशा उपाययोजना करण्यासाठी शैक्षणिक परिसरात सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे, सर्व विद्यार्थ्यांना ओळखपत्र लावून महाविद्यालयात प्रवेश बंधनकारक करणे, योग्य ठिकाणी सुरक्षा रक्षकाची नियुक्ती करणे इत्यादि बाबींचा अवलंब करणेबाबत मा.राज्यमंत्री महोदयांनी वरील दि.१९.९.२०१७ च्या पत्रान्वये मा.राज्यमंत्री, (गृहनिर्माण व उच्च व तंत्र शिक्षण) यांनी आदेशीत केले आहे. तरी सदर प्रकरणी कार्यवाही होण्यासाठी आपल्या अधिपत्याखालील सर्व संबंधीतांना कळविण्यात यावे व त्याचा अनुपालन अहवाल शासनास सादर करण्यात यावा, अशी विनंती आहे.

आपला विश्वासू,

( रा.वि.आवरे )

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

शा २६८०७
३० /१०/२०१७

रविंद्र दत्तात्रय वायकर
पालकमंत्री - रत्नागिरी जिल्हा

मंत्री
[illegible]
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

www.maharashtra.gov.in
ई-मेल : stateminister.housing@gmail.com

दिनांक : १९ सप्टेंबर, २०१७

विषय : महाराष्ट्र राज्यातील सर्व विद्यापीठ व महाविद्यालयातील विद्यार्थी-
विद्यार्थीनींच्या सुरक्षेबाबत उपाययोजना करणे संदर्भात.......

राज्यात दिवसेंदिवस विद्यार्थ्यांचा उच्च शिक्षणाकडे कल वाढत असून, विद्यार्थी मोठया संख्येने राज्यातील विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये अभ्यासक्रमांना विविध अभ्यासक्रमांना प्रवेशित होत आहेत. नवनविन अभ्यासक्रमांच्या मागण्यांमुळे नविन अभ्यासक्रमांच्या अतिरिक्त तुकडया अथवा नविन महाविद्यालयांची संख्या देखील झपाटयाने वाढत आहे.

अलीकडे महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षे संदर्भात वर्तमानपत्रातून अथवा इलेक्ट्रॉनिक मिडीयातून विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या रॅगिंग, दहशत, लैंगीक शोषण, प्रसंगी खुन इ. गंभीर घटनांमध्ये वाढ झाल्याचे बातम्यांतून कळते. यामुळे विविध विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न देखिल ऐरणीवर आला आहे. विद्यापीठे व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची सुरक्षा ही संबधित शैक्षणिक संस्थेच्या प्रशासनाची आहे परंतु कांही शैक्षणिक संस्थांच्या शैक्षणिक परिसर व वसतिगृहे, ग्रंथालय, उपहारगृह इ.मध्ये सुरक्षेच्या पुरेशा उपाययोजना केल्याचे आढळून येत नाही. त्यामुळे दिवसेंदिवस वरिल घटनांमध्ये वाढ होत आहे. त्याकरिता सर्व संबधित विद्यापीठे व महाविद्यालयांनी विद्यार्थी व विद्यार्थीनींच्या सुरक्षिततेच्या उपाययोजना म्हणून संपुर्ण शैक्षणिक परिसरात सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे, सर्व विद्यार्थ्यांना ओळखपत्र लावून महाविद्यालयात प्रवेश बंधनकारक करणे, योग्य ठिकाणी सुरक्षा रक्षकाची नियुक्ती करणे इत्यादि बाबींचा अवलंब करणे अत्यंत आवश्यक आहे.

शैक्षणिक संस्थांतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न अत्यंत संवेदनशील असून त्यास गांभीर्याने घेणे गरजेचे असल्याने राज्यातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांना विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत पुरेशा व योग्य उपाययोजना करण्याबाबत कळवून त्याचा अनुपालन अहवाल एक महिन्यात शासनास सादर करण्याबाबत सुचना आपल्यास्तरावरुन निर्गमित कराव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सत्वर मला अवलोकनार्थ सादर करावा.

(रविंद्र दत्तात्रय वायकर)

प्रति,

अप्पर मुख्य सचिव,
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२